जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७०७ दिनांक - १८/०९/२०२३**

सायबर पोलिस स्टेशन पुणे शहर

# पार्ट टाईम जॉब चे प्रलोभन देवून गुगल रिव्हयूव सर्च टाक्स देवून त्याव्दारे लोकांची फसवणूक करणा-या टोळीतील आणखी एक आरोपीतास अटक केलेबाबत.

सायबर पोलीस स्टेशन,पुणे शहर येथे गुरनं.१०४/२०२३,भादवि कलम ४२०,४१९,३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ ड अन्वये गुन्हयातील फिर्यादी यांना आरोपीतांनी वॉट्सअॅप व्दारे संपर्क साधून त्यांना पार्ट टाईम नोकरीचे बहाण्याने गुगल सर्च टास्क देवून जास्त कमिशन मिळेल असे आमिष दाखवून त्यांना टास्क पुर्ण केल्यावर कमीशन म्हणून फिर्यादी यांचे बँक अकाउंटला काही किरकोळ रक्कम जमा करुन त्यांचा विश्वास संपादन केला.त्यानंतर अधिक फायदयाकरीता फिर्यादीस टेलीग्राम ग्रुपवर प्रीपेड टाक्स करण्यास सांगून वेळोवेळी जास्त रक्कम डिपॉझीट करण्यास लावून त्यांचेकडून विविध टास्क करुन घेतले व कोणताही परतावा न देता फिर्यादी यांची रक्कम रु.३४,९७,०००/- ची ऑनलाईन फसवणूक केली. म्हणून दिले तक्रारीवरून गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयातील फिर्यादी यांनी त्यांची रक्कम ट्रान्सफर केलेले आयसीआयसीआय बँक खाते क्रमांक १६१०५५०१४६५ याची माहिती प्राप्त करुन घेतली.तसेच सदर अकाउंट मधून गुन्हयातील काही रक्कम SPAY TECHNOLOGY PVT या पेमेन्ट गेटवे कंपनीच्या बँक अकाउंटवर ट्रान्सफर झाल्याची माहिती मिळाली.सदर माहितीच्या आधारे दिनांक १६/०९/२०२३ रोजी आरोपी नामे तुषार अजवानी यास दिनांक १४/०९/२०२३ रोजी अटक करण्यात आली होती.नमुद आरोपीताकडे पोलीस कोठडी रिमांड दरम्यान केले तपासात त्यास भारतीय चलनाचे बदल्यात युएडीटी उपलब्ध करुन देणा-या आरोपीताचे नाव मयुर निकम असल्याचे सांगून तो मिरज,सांगली येथे राहणार असल्याची माहिती दिली.त्याप्रमाणे सायबर पोलीस स्टेशन कडील एक पोलीस मिरज,सांगली येथे एक पथक दिनांक १६/०९/२०२३ रोजी खाजगी वाहनाने रवाना केले.सदर पथकास आरोपी नामे मयुर दिलीप निकम,वय ३४ वर्षे,धंदा ट्रेडींग,रा.कमान वेस,घोरपडे वाडा, ता.मिरज, जिल्हा सांगली,४१६,४१० हा मिळून आल्याने त्यास सायबर पोलीस स्टेशन कडील नमुद गुन्हयात दिनांक १६/०९/२०२३ रोजी २१.४५ वा.अटक करण्यात आली.नमुद आरोपीतास दिनांक १७/०९/२०२३ रोजी मा.न्यायालयाने गुन्हयाचे गांभिर्य पाहून दि.२१/०९/२०२३ रोजी पर्यत पोलीस कोठडी मंजूर केली आहे.तरी आरोपीताकडे सखोल तपास करुन त्याचे साथीदारांचा शोध घेण्यास प्रयत्नशील आहोत.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री. रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर, श्री.संदिप कर्णीक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे श्री.रामनाथ पोकळे,मा.पोलीस उपआयुक्त,आर्थिक व सायबर गुन्हे,श्री.श्रीनिवास घाडगे मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,आर्थिक व सायबर गुन्ह,श्री.आर.एन.राजे, यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील व.पो.नि.मिनल सुपे-पाटील, पोलीस उप निरीक्षक सचिन जाधव, पोलीस अंमलदार राजकुमार जाबा,नवनाथ जाधव,सुनिल सोनुने,संदेश कर्णे, नितीन चांदणे,शाहरुख शेख व निलेश लांडगे या पोलीस पथकाने यशस्वी रित्या पार पाडली.अशा प्रकारे टास्क फ्रॉड,पार्ट टाईम जॉब,जादा परतावा तसेच कमीशन मिळेल अशी आमीषे दाखविणा-या गुन्हेगारी टोळयांपासुन सावध राहण्याबाबत सायबर पोलीस स्टेशन,शिवाजीनगर,पुणे शहर यांचेकडुन जनतेस आवाहन करण्यात येत आहे.